# आपलं पाणी प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

♦ **आपलं पाणी प्रकल्पाच्या** बाबतीतील सर्व निर्णय ग्रामसभेत घेणे अनिवार्य आहेत. सर्वप्रथम ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती च्या बेठकीमध्ये विषयांकीत ठराव पारित करुन सामाजिक लेखा परिक्षण समितीच्या मान्यता आवश्यक आहे. त्यानंतर महिला ग्रामसभेची मंजूरी आवश्यक आहे. सदर मंजूरी मिळल्यानंतर हा ठराव जनरल ग्रामसभेत मांडणे बंधनकारक आहे .या ग्रामसभांना एकूण मतदारांच्या चाळीस टक्के मतदार उपस्थित असणे आवश्यक आहे. या ग्रामसभेत एकूण महीला मतदारांच्या पन्नास टक्के महिला उपस्थित असणे आवश्यक आहे.

♦ ग्रामसभेने ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच सामाजीक लेखा समितीला दिलेले अधिकार त्या समित्यांने योग्य प्रकारे वापरले नाहीत तर त्यावर संनियंत्रण ठेवून,कोणताही हलगर्जीपणा ग्रामसभेच्या समोर मांडणे ही ग्रामपंचायतची जबाबदारी राहील.

♦ एखादा पर्याय निवडण्यासाठी तो देखभाल- दुरुस्ती आणि भांडवली किमतीच्यादृष्टीने सर्वात किफायतशीर असला पाहिजे. या प्रकल्पात समाजातील सर्व घटकांना समावून घेतले जाणे अ-निवार्य आहे.

♦ हा प्रकल्प पूर्णपणे पारदर्शक आहे.या प्रकल्पातील सर्व माहिती आणि कागदपत्रे जनतेच्या माहितीसाठी प्रकल्पाच्या सर्व स्तरावर नेहमी उपलब्ध केली गेली पाहिजेत.

♦ प्रत्येक व्यक्तीला चाळीस लिटर्स पाणी दररोज मिळेल यासाठीच सर्व नियोजन करावयाचे आहे.

♦ दरडोई चाळीस लिटर्सपेक्षा पेक्षा जास्त पाणी गावास पाहिजे असल्यास अशा ज्यादा पाण्याच्या उपलब्धतेसाठी लागणा-या खर्चाची जबाबदारी संबधीत गावकऱ्यांना उचलावी लागेल.

## ग्रामसभा आणि आपलं पाणी :-

**आपलं पाणी** हा प्रकल्प संपूर्णपणे गावाचा आहे प्रकल्पांतर्गत प्रत्येक कृतीसाठी ग्रामसभेने मंजुरी दिल्यानंतरच होते. अगदी आपल्या गावात हा प्रकल्प आणायचा की ाही हा निर्णयही ग्रामसभेतच घ्यायचा असतो.ग्रामसभेला आता अत्यंत महत्वाचे अधिकार मिळाले आहेत. आपल्या गावाची गरज काय आहे ?

**आपलं पाणी प्रकल्पातील योजनेचा तपशिल दर्शविणारा संबधीत गावातील माहिती फलक**







"आपलं पाणी " प्रकल्प उखलगांव ता.श्रीगोंदा योजनेच्या कामाची पाहणी करताना मा.प्रधान सचिव श्री.धुमाळ साहेब पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन

| | |
|---|---|
| ती भागविण्यासाठी गावातच काय उपलब्ध आहे ? त्याचा कसा वापर करता येईल? आदींबाबत ग्रामस्थानांच चांगली माहिती असते,आतापर्यंत ग्रामस्थांना विचारात न घेताच मोठ मोठ्या योजना आल्या तशा गेल्या.पण आता सर्व अधिकार ग्रामसभेलाच आहेत. या प्रकल्पात सहभागी होण्याबद्दल वृत्तपत्रांत जाहिरात येताच हा विषय ग्राम पंचायतीने ग्रामसभेत ठेवनू तेथे या प्रकल्पाची माहिती देऊन ग्रामसभेची मंजूरी मिळाल्या नंतरच अर्ज करावा लागतो. अशाच प्रकारे प्रकल्पात सांगितलेल्या समित्यांची निवड असेल किंवा प्रकल्पासाठी अभ्यासदौऱ्यावर जायचे असेल तर प्रत्येकवेळी ग्रामसभेची मंजुरी घ्यावीच लागते.प्रत्येक पैशाचा हिशेब घेण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे तसाच त्या हिशेबाला मंजूरी देण्याचा अधिकाराही ग्रामसभेलाच आहे.आपल्याला मदत करण्यासाठी कोणाची नेमणूक करायची हेही ग्रामसभाच ठरविणार आहे.विशेष म्हणजे प्रत्येक ग्रामसभेपूर्वी महिलांची ग्रामसभा होणे आवश्यक आहे, महिलांच्या ग्रामसभेत झालेल्या ि-नर्णयांकडे कोणत्याही परिस्थीतीत दुर्लक्ष करता येत न-ाही तसेच कोणत्याही ग्रामसभेला चाळीस टक्के उपस्थिती आवश्यक आहे. या प्रकल्पात ग्रामसभेला शक्तीकेंद्र मानले गेले आहे. | |

**आपलं पाणी प्रकल्पातील समित्या आणि त्यांची कर्तव्ये :-**

याप्रकल्पात ग्रामसभेत निवडण्यात आलेल्या तीन समित्यां अत्यंत महत्वाच्या आहेत.

♣ ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती :- या समितीत कमीत कमी १२ नि जास्तील जास्त २४ सदस्य असतील, यात ५० टक्के महिला व १/३ ग्रामपंचायत सदस्य असणे बंधनकारक आहे. ३० टक्के मागासवर्गीना प्रतिनिधीत्व देणे आवश्यक आहे, गावातील प्रत्येक वार्डला यात प्रतिनिधीत्व अपेक्षीत आहे. अध्यक्ष, सचिव निवडतांना महिलांना प्राधान्य, खजिनदार हे पदही या समितीत आवश्यक आहे ग्रामपातळीवरील संस्थांच्या प्रतिनिधींना प्राधान्य, ग्रामस्तरीय शासकीय / जि.प. / ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची आमंत्रीत व सहकारी म्हणून समितीवर निवड करता येईल परंतु त्यांना मतदानाचा अधिकार नसेल. ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती सदस्यांची निवड ग्रामसभेतच होईल, सर्वांमध्ये समन्वय राखणे, सहभागी पद्धतीने नियोजन आराखडा तयार करणे, नवीन पाणी सुविधेचे नियोजन करणे, पाणीपट्टी गोळा करणे त्यातून देखभाल दुरुस्तीचा खर्च भागविणे आदी कार्य या समितीला करावी लागतात.

ग्रामसभेच्या प्रकल्पविषयक निर्णयाची तसेच नियोजन रचना यांची अंमलबजावणी करणे,देखभाल दुरुस्ती करणे,ग्रामसभेस ग्रामपंचायतीमार्फत सर्व व्यवहारांची माहिती देऊन जमाखर्च हिशेब सादर करणे, सर्व व्यवहार पारदर्शक ठेवणे आदी या समितीची कार्य आहेत.

♣ सामाजीक लेखा परीक्षण समितीः- या समितीत किमान १२ तर कमाल २४ सदस्य आवश्यक आहेत. त्यापैकी १/३ सदस्य हे ग्रामपंचायत सदस्य असतील. ५० टक्के महिला सदस्य, हिशोब व नोंदींच्या कामाचा अनुभव असलेला किमान एक सदस्य असेल,बांधकाम क्षेत्राचा अनूभव असलेला किमान एक सदस्य असणे आवश्यक आहे,यात अध्यक्ष आणि सचिव असे दोनच पदाधिकारी असतील. एकच व्यक्ती एकाच वेळी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व सामाजिक लेखा परिक्षण समिती या दोन समित्यांचा सदस्य असू शकणार नाही.

प्रकल्प प्रक्रीयेवर देखरेख करणे व **आपलं पाणी प्रकल्पाच्या** काटेकोर अंमजबजावणीकडे लक्ष देणे, निधीचा योग्य वापर, खरेदी व्यवहारात पारदर्शकता, बांधकामातील प्रगती, साहित्याचा निर्धारीत कामांसाठी उपयोग गावकृती आराखड्यानुसार प्रकल्प अंमलबजावणी, अभिलेख पूर्ण आहेत किंवा कसे यावर लक्ष ठेवणे, योजनेचा लाभ गावातील सर्व घटकांना मिळतो याची खात्री करणे, आदी या समितीची कार्य आहेत. या समितीने वेळोवेळी जिल्हा परिष्द आणि ग्रामप्ंचायतमध्ये अहवाल सादर करावेत. शिवाय अहवालावर चर्चा करण्यासाठी ही समिती विशेष ग्रामसभा आयोजीत करु शकते.

**उपसमित्या :-**

ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीच्या खरेदी समिती, हिशोब समिती, देखरेख समिती अशा उपसमित्या असतील. उपसमित्यांतील सदस्य संख्या ४ ते ६ असावी व त्यापैकी किमान ५० टक्क् सदस्य महिला असाव्यात.

**खरेदी समिती**

- गाव कृती आराखडयाची अंमलबजावणी करताना लागणा-या विविध वस्तूंच्या (साहित्य व अवजारे) किमती बाजार पेठेतून गोळा करणे.
- कोटेशन व बिलांची पडताळणी करुन ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कडे शिफारस करणे.
- प्रकल्प अंमलबजावणीसाठी लागणा-या सर्व साहित्याचा दर्जा व गुणवत्ता तपासून खरेदी करणे.

**हिशोब समिती**

- गाव कृती आराखडयानुसार निधीचा वापर केला जात आहे किंवा नाही याची खात्री करणे.
- खरेदी संदर्भातील कागदपत्र् उदा.कोटेशन, बिले इ.ची छाननी करुन ती नियमानुसार आहेत किंवा नाहीत याची खातरजमा करणे.